महाराष्ट्र शासन

**अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके यांचे कार्यालय,**
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्रमांक ०२२- २२८१०२२२ Email ID : adg.trg.office@mahapolice.gov.in

---

क्रमाक: प्रशिक्षण/परिक्षा-२/पीआरटी-सुपरवाझरी परिक्षा/११५/२०१९-1766. दिनांक: ०९/०४/२०२५

संदर्भ :- १) या कार्यालयाचे क्र. प्रशिक्षण/परिक्षा-२/पीआरटी-सुपरवाझरी परिक्षा/११५/२०१९- २१६, दिनांक ०३/०२/२०२५ चे ज्ञापन.

२) या कार्यालयाचे क्र. प्रशिक्षण/परिक्षा-२/पीआरटी-सुपरवाझरी परिक्षा/११५/२०१९- ७२४, दिनांक ०४/०४/२०२५ चे ज्ञापन.

विषय :- वरिष्ठ श्रेणी लिपीकांची पर्यवेक्षीय परीक्षा आणि कनिष्ठ श्रेणी लिपीकांची सेवाप्रवेशोत्तर परीक्षा -२०२४-२०२५ आयोजित करण्याबाबत.

********

**परिपत्रक :**

शासन निर्णय क्र.एमआयएस/ १०६४/६०६७१- रोमन सहा.दि.१५/४/१९७१, विवरणपत्र २ आणि मुंबई पोलीस नियमावली भाग-१, नियम १९२ मधील तरतुदी तसेच या कार्यालयाच्या सदर परीक्षेसंदर्भात वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकांनुसार पोलीस विभागातील वरिष्ठ श्रेणी लिपीकांची पर्यवेक्षीय परीक्षा व कनिष्ठ श्रेणी लिपीकांची सेवाप्रवेशोत्तर पदोन्नतीसाठी विभागीय अर्हता परीक्षा आयोजित केल्या जातात. **या वर्षी उपरोक्त परीक्षा दि. २२/०४/२०२५ ते दि.२४/०४/२०२५ या कालावधीत घेण्यात येतील.**

सदर परीक्षेसाठी खालील नमूद परीक्षा केंद्र प्रमुख यांची नेमणूक करण्यात येत असून खालील नमुद परीक्षा केंद्र प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील येणाऱ्या सर्व पोलीस घटक कार्यालयातील **लिपीक कर्मचाऱ्यांची परीक्षा घेण्याकरिता परीक्षा केंद्र ठरविण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.**

**परीक्षा केंद्र प्रमुख यांचे विवरणपत्र :**

| अ.क्र | परीक्षा केंद्र प्रमुख | परीक्षा केंद्रांतर्गत येणारी पोलीस घटक कार्यालये |
|---|---|---|
| १. | विशेष पोलीस महानिरीक्षक,प्रशिक्षण व खास पथके,महाराष्ट्र राज्य,मुंबई<br>**उप केंद्र प्रमुख:** प्राचार्य,पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ,मुंबई. | पोलीस महासंचालक, म.राज्य, मुंबई यांचे शहर लिपीक संवर्गातील मुंबई शहरातील सर्व पोलीस कार्यालये. (पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई वगळून) |
| २. | विशेष पोलीस महानिरीक्षक, कोंकण परिक्षेत्र, नवी मुंबई. | कोंकण परिक्षेत्रातंर्गत येणारी सर्व पोलीस घटक कार्यालये |
| ३. | विशेष पोलीस महानिरीक्षक,नाशिक परिक्षेत्र, नाशिक | नाशिक परिक्षेत्रातंर्गत येणारी सर्व पोलीस घटक कार्यालये |
| ४. | विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापुर परिक्षेत्र | कोल्हापुर परिक्षेत्रातंर्गत येणारी सर्व पोलीस घटक कार्यालये |
| | विशेष पोलीस महानिरीक्षक,औरंगाबाद परिक्षेत्र | औरंगाबाद परिक्षेत्रातंर्गत येणारी सर्व पोलीस घटक कार्यालये |
| ६. | विशेष पोलीस महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र | नांदेड परिक्षेत्रातंर्गत येणारी सर्व पोलीस घटक कार्यालये |

| | | |
|---|---|---|
| ७. | विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र | अमरावती परिक्षेत्रांतर्गत येणारी सर्व पोलीस घटक कार्यालये |
| ८. | विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपुर परिक्षेत्र | नागपुर परिक्षेत्रांतर्गत येणारी सर्व पोलीस घटक कार्यालये ,तसेच गडचिरोली परिक्षेत्रातील सर्व पोलीस कार्यालये |

वर नमूद केल्याप्रमाणे पोलीस विभागातील वरिष्ठ श्रेणी लिपीकांची पर्यवेक्षीय परीक्षा व कनिष्ठ श्रेणी लिपीकांची सेवाप्रवेशोत्तर पदोन्नतीसाठी विभागीय अर्हता परीक्षा २०२४-२५ चे **वेळापत्रक खालील प्रमाणे आहे**:-

**कनिष्ठ श्रेणी लिपीकांची सेवाप्रवेशोत्तर परिक्षा (PRT)**

| दिनांक | वेळ | पेपर | विषय | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| भाग-१ | | | | |
| २२/०४/२०२५ | १०.०० ते १३.०० (३ तास ) | पेपर १ | कार्यसंघटना व संबंधित बाबी | १०० |
| २२/०४/२०२५ | १४.०० ते १७.०० (३ तास ) | पेपर २ | कार्यालयीन पध्दती | १०० |
| २३/०४/२०२५ | १०.०० ते १३.०० (३ तास ) | पेपर ३ | टिप्पणी व मसुदा लेखन इत्यादी | १०० |
| भाग-२ | | | | |
| २३/०४/२०२५ | १४.०० ते १७.०० (३ तास ) | पेपर १ | पोलीस मॅन्युअल (पुस्तकासह) | १०० |
| २४/०४/२०२५ | १०.०० ते १२.०० ( २ तास ) | पेपर २ | कायदा (पुस्तकासह) | ५० |
| २४/०४/२०२५ | १४.०० ते १६.३०(२.३० तास) | पेपर ३ | संकिर्ण- टंकलेखन / मसुदा लेखन पोलीस विषय | १०० |

**वरिष्ठ श्रेणी लिपीकांची पर्यवेक्षीय परिक्षा (Supervisory)**

| दिनांक | वेळ | पेपर | विषय | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| भाग-१ | | | | |
| २२/०४/२०२५ | १०.०० ते १३.०० (३ तास ) | पेपर १ | १) महाराष्ट्र शासनाची रचना<br>२) केंद्र शासनाची रचना | १०० |
| २२/०४/२०२५ | १४.०० ते १७.०० (३ तास ) | पेपर २ | १)रचना,नियंत्रण,शिस्त (प्रकरण १ ते ८)<br>२) महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक,शिस्त व अपील नियम व विभागीय चौकशी नियमावली | १०० |
| २३/०४/२०२५ | १०.०० ते १३.०० (३ तास ) | पेपर ३ | सेवा नियम (महाराष्ट्र नागरी सेवा) व लेख्याचे प्रात्यक्षिक | १०० |
| २३/०४/२०२५ | १४.०० ते १७.०० (३ तास ) | पेपर ४ | वित्तीय नियंत्रण | १०० |
| भाग-२ | | | | |
| २४/०४/२०२५ | १०.०० ते १३.०० (३ तास ) | पेपर १ | पोलीस मॅन्युअल (पुस्तकासह) | १०० |
| २४/०४/२०२५ | १४.०० ते १७.०० (३ तास ) | पेपर २ | कायदा (पुस्तकासह) | १०० |

**पोलीस महासंचालक, म.राज्य, मुंबई यांचे शहर लिपिक संवर्गातील वरिष्ठ श्रेणी लिपिक यांची पर्यवेक्षीय व कनिष्ठ श्रेणी लिपिकांची सेवाप्रवेशोत्तर परीक्षा-२०२४-२५ ही पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ, मुंबई यांच्या कार्यालयात घेण्यात येईल.**

**वर नमूद सर्व घटक प्रमुखांनी उपरोक्त परीक्षेच्या अनुषंगाने खालील नमुद सुचना सर्व संबंधित परीक्षार्थींच्या निदर्शनास आणाव्यात:-**

१. कनिष्ठ श्रेणी लिपीकांसाठीची सदर परीक्षेतील भाग-२, पेपर क्र.३ मधील टंकलेखनाची परीक्षा ही टंकलेखन मशिनवर न घेता संगणकावर घेण्यात येईल.

२. शासन निर्णय क्र.एमआयएस/ १०६४/६०६७१- रोमन सहा.दि.१५/४/१९७१, विवरणपत्र २ आणि मुंबई पोलीस नियमावली भाग-१, नियम १९२ मधील तरतुदी तसेच या कार्यालयाच्या वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकांनुसार सेवाप्रवेशोत्तर व पर्यवेक्षीय परीक्षा घेण्यात येतात. यावर्षी परीक्षा समितीने शासन निर्णय दि.१५/०४/१९७१ मधील तरतुदींनुसार सेवाप्रवेशोत्तर परीक्षा (PRT) उत्तीर्ण होण्यासाठी कनिष्ठ श्रेणी लिपिकांना प्रत्येक विषयात किमान ३५% व एकत्रित ४०% गुण प्राप्त करणे आवश्यक आहे असा निर्णय घेतला आहे.

३. कनिष्ठ श्रेणी लिपिकांच्या सेवाप्रवेशोत्तर परिक्षेत परिक्षार्थी अनुत्तीर्ण झाला असेल आणि एखाद्या विषयात त्याला किमान ५०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळाल्यास पुढील परीक्षेच्या वेळी सदर विषयात सुट देय राहील.

४. कनिष्ठ श्रेणी लिपिकांच्या सेवाप्रवेशोत्तर परीक्षेत परिक्षार्थी एका विषयात अनुत्तीर्ण झाला असेल आणि त्याला एकुण गुणाच्या ५०% गुण प्राप्त झाले असतील अशा उमेदवाराला उत्तीर्ण म्हणून घोषित करण्यात येईल. परंतु त्याला अनुत्तीर्ण झालेल्या एका विषयात पुढील परिक्षेच्या वेळी उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

५. वरिष्ठ श्रेणी लिपिकास पर्यवेक्षीय परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक विषयात किमान ४०% व एकत्रित ५०% गुण प्राप्त करणे आवश्यक आहे. उमेदवार पर्यवेक्षीय परिक्षेत अनुत्तीर्ण झाला असेल आणि एखाद्या विषयात त्याला किमान ६०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळाल्यास पुढील परीक्षेच्या वेळी सदर विषयात सुट देय राहील.

६. वरिष्ठ श्रेणी लिपीक पर्यवेक्षीय परीक्षेत एका विषयात अनुत्तीर्ण झाला असेल आणि त्याला एकुण गुणाच्या ६०% गुण प्राप्त झाले असतील अशा उमेदवाराला उत्तीर्ण म्हणून घोषित करण्यात येईल. परंतु त्याला अनुत्तीर्ण झालेल्या एका विषयात पुढील परिक्षेच्या वेळी उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

७. सदर दोन्ही परीक्षेस १ % अनुग्रह गुण देय आहे. मात्र परीक्षार्थी एका परीक्षेच्या संधीत जेवढया विषयाच्या पेपरमध्ये बसेल तेवढयाच विषयांच्या एकुण गुणांच्या १% अनुग्रह गुण देण्यात येईल.

८. पुस्तकासह असलेल्या पेपरमध्ये उमेदवार शासन मान्य पुस्तके किंवा त्याच्या छायांकित प्रती स्वत: आणतील. सदरची पुस्तके किंवा छायांकित प्रती, कार्यालयांकडुन किंवा परिक्षा केंद्र प्रमुखांकडुन पुरविली जाणार नाहीत.

९. प्रश्नपत्रिकेचे व उत्तरपत्रिकेचे माध्यम पूर्णत: मराठी भाषेत राहील.

१०. परीक्षा केंद्रात / गृहात परीक्षार्थींकडे आक्षेपार्ह चिठठया,उत्तरे इत्यादी लेखी साहित्य किंवा भ्रमणध्वणी यंत्र आढळुन आल्यास परीक्षार्थींचे सदर पेपरमध्ये आक्षेपार्ह वर्तन म्हणून घोषित करण्यात येईल व अशाप्रकारे परीक्षेच्या वेळी आक्षेपार्ह वर्तन करताना आढळल्यास उमेदवारांना पुढील विषयाच्या पेपर मध्ये अपात्र ठरवून उमेदवारांविरुध्द शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र. परीक्षा १०८९/प्र.क्र.२०-८९/ सतरा, दि.२८/५/१९९३ प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

११. सदर परीक्षेच्या उत्तरपत्रिकांच्या **फेरतपासणी बाबत नियमात तरतूद नसल्याने उत्तरपत्रिकांच्या फेरतपासणी करीता उमेदवारांनी या कार्यालयास अर्ज केंल्यास त्यांच्या फेरतपासणी अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.**

१२. तथापि, उत्तरपत्रिकेतील गुणांच्या फेरमोजणीकरीता उमेदवारांकडून सदर परीक्षेचा **निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत परीक्षा केंद्र प्रमुखांकडे विनंती अर्ज** पाठविण्यात आले तरच त्यांच्या उत्तरपत्रिकांतील गुणांची फेरमोजणी करण्यात येईल, तथापि त्यानंतर फेरमोजणी करीता प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

१३. घटक प्रमुखांनी त्यांच्या आस्थापनेवरील लिपिक इतर कार्यालयात प्रतिनियुक्तीवर नेमणुकीस असतील व ते लिपिक परीक्षेस बसण्यास पात्र ठरत असतील तर उपरोक्त सूचना त्यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

सदर परीक्षेकरीता या कार्यालयाच्या संदर्भाधीन पत्रान्वये सर्व घटक प्रमुखांना त्यांनी त्यांच्या परिक्षेत्रातील सर्व पोलीस घटकातील कनिष्ठ व वरिष्ठ श्रेणी लिपिकांकरीता एका महिन्याचे प्रशिक्षण आयोजित करण्याबाबत तसेच त्यांच्या अधिपत्याखालील व परीक्षेस बसण्यास इच्छूक असलेल्या कनिष्ठ व वरिष्ठ श्रेणी लिपिकांची माहिती, व त्यांचे अर्ज साक्षांकित करुन या कार्यालयास पाठविण्याबाबत कळविण्यात आले आहे. तरी सर्व घटकप्रमुखांनी त्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करावी अन्यथा त्याची पुर्णत: जबाबदारी घटक प्रमुखांची राहील.

सदर परिपत्रक पोलीस महासंचालक यांच्या वेबसाईट www.mahapolice.gov.in वर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

प्रविण पडवळ
09.04.25

**( प्रविणकुमार पडवळ )**
विशेष पोलीस महानिरीक्षक,
प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सविनय सादर )
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.राज्य, मुंबई (सविनय सादर )
अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल गट ,म.राज्य,मुंबई / लोहमार्ग सुरक्षा पथक, म.राज्य, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त, (मुंबई शहर वगळुन) लोहमार्ग मुंबई सह.
संचालक, पोलीस बिनतारी संदेश विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य,पुणे.
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
**सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक, कोंकण परिक्षेत्र,नवीमुंबई / नाशिक //कोल्हापूर/ छत्रपती संभाजीनगर/नांदेड /अमरावती / नागपूर/प्राचार्य,पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ,मुंबई.**
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपुर.
विशेष पोलीस महानिरीक्षक, फोर्स वन, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, /मोटार परिवहन विभाग, म.राज्य,पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, विसुप्रशा, वडाची वाडी, पुणे
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र.
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग नागपुर / पुणे सह )
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र १ ते १६.
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र /राज्य राखीव पोलीस बल प्रशिक्षण केंद्र, नानविज.
प्राचार्य, अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र नागपुर.
उपसंचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय ,नाशिक.